PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Mantryachi Sun
Year: 1980

Song: Ramya Vanshri Eklich Mi
Lyricist: Jagdish Khebudkar

रम्य वनश्री एकलीच मी
आश्रम हरिणी इथे
नको प्रियतमा पारध माझी
थांब जरासा इथे
कसली पारध कसली शिक्षा
कसले शरसंधान
वेध घेऊनी तूच सोडीसी
नयन धनुचे बाण
अपराधी मी मला करावे
शासन हे प्रियकरा
कमलांगी तू प्रणयदेवते
घे हृदयी आसरा
घे हृदयी आसरा

भेट अशी ही घडली घडली
भेट अशी ही घडली
मने मनावर जडली जडली
भेट अशी ही घडली घडली
भेट अशी ही घडली

चारूदात्री तू यौवनसुलभा
ही मदनाची चंचल प्रतिभा
चारूदात्री तू यौवनसुलभा
ही मदनाची चंचल प्रतिभा
स्वप्नामधल्या प्राणेश्वरीची
भूल मला पडली पडली
भेट अशी ही घडली घडली
भेट अशी ही घडली

लज्जांकीत या संकोचाने
थरथरले मी सर्वांगाने
लज्जांकीत या संकोचाने
थरथरले मी सर्वांगाने
स्पर्श सुखाने देहपाकळी
फुलताना अडली अडली
भेट अशी ही घडली घडली
भेट अशी ही घडली

मंगल क्षण हा शृंगाराचा
जीवा शिवाच्या आधाराचा
मंगल क्षण हा शृंगाराचा
जीवा शिवाच्या आधाराचा
बंधनात या मुक्तपणाची
जाणीव ही दडली दडली
भेट अशी ही घडली घडली
भेट अशी ही घडली
मने मनावर जडली जडली
भेट अशी ही घडली घडली
भेट अशी ही घडली घडली
भेट अशी ही घडली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*